# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००५९०**

**अपिलार्थी श्री. कांति ह. कारीया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी -१**
उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय, रुम नं ३०३,
तिसरा मजला, ए विंग, बी एम सी गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्पेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पू), मुंबई- ४०० १०१.

**प्रथम अपिलीय अधिकारी,**
उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय, रुम नं ३०३,
तिसरा मजला, ए विंग, बी एम सी गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्पेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पू), मुंबई- ४०० १०१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०२.२०२२**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.११.२०२० | - | ०५.०१.२०२१ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १९.०२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २५.११.२०२० अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

*"वार्षिक टाळेबंद अहवाल व लेखा परीक्षक अहवाल आपल्या कार्यालयात सादर केल्याची स्थळप्रत."*

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतेही उत्तर दिलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या उत्तराची प्रत आयोगासमोर सादर केली.

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००५९०**

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

१) **जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेले उत्तर १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पाठवावे.**

२) **अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक : २८.०२.२०२२

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई